# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 13/01/2021 (बुधवार)
(दुपार)

---

**शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद**

पो. स्टे. खापा:– फिर्यादी नामे– गौरी राहुल साहारे, वय 26 वर्ष, रा. साई नगर, गुरू छाया कॉलनी अमरावती व आरोपी नामे– 1) पति– राहुल शालीकराम साहारे, वय 38 वर्ष हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत 08 कि.मी. अंतरावर मौजा वाकोडी येथे दिनांक 17/05/2020 चे तीन चार दिवसा पासुन ते दिनांक 27/10/2020 चे 15.00 वा. पर्यंत फिर्यादी हिचे लग्न झाले पासुन तीन चार दिवसा नंतर आरोपी नामे– 1) राहुल शालीकराम साहारे 2) पंचफुला साहारे (सासु), 3) सचिन सहारे, 4) शुंभागी कोलते (नंनद), 5) नरेश कोलते (नंदयी) यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. फिर्यादीस नोकरीत 4,500/–रू. पगारी असल्याचे सागुंन फसवणुक आरोपी क्र. 1 ते 5 यांनी केली. तसेच दिनांक 27/10/2020 रोजी फिर्यादीचे वडीलाचा घरी येवुन शिवीगाळ करून त्यांना दोन चार गालावर थापडा मारून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 437, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ मुकुंदा लोंदे 9850900768 हे करीत आहे.

**गळफास लावून मृत्यु**

1) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 18 कि. मी. अंतरावर मौजा तिष्टी शिवार येथे दिनांक 12/01/2021 चे 13:00 वा. दरम्यान रजत गांधीलाल जिवतोडे, वय 45 वर्ष, रा. तिष्टी, ता. कळमेश्वर याने अज्ञात कारणाने लाकडाच्या बल्लीला दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सतिश गांधीलाल जिवतोटे, वय 45 वर्ष, रा. तिष्टी ता. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. केळवद येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ कामटे हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावर मौजा डब्लुसीएल बजाज कॉलनी वाघोडा येथे दिनांक 12/01/2021 चे 09:00 वा. दरम्यान शंकर गुलाबराव मोतीकर, वय 55 वर्षे, रा. डब्लुसीएल बजाज कॉलनी वाघोडा क्वा.नं. 09/01 सावनेर याने अज्ञात कारणातुन त्याचे राहते घरी गळयात टेरीकॉटच्या साडीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रजत शैलेद्र ठोंबरे, वय 30 वर्षे, रा. डब्लुसीएल बजाज कॉलनी वाघोडा क्वा.न. 09/01 सावनेर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक नांदुरकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर